विशेष दिवाणी दावा क्र ५९/२०१४

निशाणी ५ खालील आदेश

१ वादींनी हा अर्ज दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील वादींच्या शांततामय ताब्यास हरकत करु नये आणि मौजे सुस्ते येथील गट क्र ४ मधील भीमा नदीवरील दोन इलेक्ट्रीक मोटार व पाईपलाईनने वादींना अर्ध्या हिस्स्याने दावा मिळकतीस पाणी घेण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात यावा यासाठी दाखल केला आहे.

वादींचे कथन संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे

२ मौजे मगरवाडी तालुका पंढरपूर येथील वादप़त्रात नमूद चतु :सिमे अंतर्गत व इतर वर्णनासह गट क्र ३५४/२ क्षेत्र २ हे. ४१ आर पो.ख. ११ आर(दावा मिळकत १ अ ) , मौजे तारापूर ता. पंढरपूर येथील गट क्र २२४ क्षेत्र ९७ आर पो.ख.९ आर (१ ब ), मौजे मगरवाडी ता. पंढरपूर येथील गट क्र २९३/२/२ मधील ६३ आर क्षेत्र (१ क ) आणि गट क्र २९३/५/२ मधील २ हेक्टर ४२ आर (१ ड ) व गट क ३५२/३ क्षेत्र ७० आर पो.ख. ६ आर (१ इ ) आणि मौजे भोयरे ता. मोहोळ येथील गट क्र ३९/१/ब क्षेत्र १ हे.६२ आर (१ फ ) व गट क्र २२३ पैकी ९६ आर (१ ग) या मिळकती वादाचा विषय आहेत

वादी क्र १ हा वादी क्र ३ चा पती असून वादी क्र २ त्यांचा मुलगा आहे. त्यांचे हिंदू एकत्र कुटुंब असून ते मुळचे तारापूर ता. पंढरपूर येथील रहिवासी आहेत. प्रतिवादी क्र.१ हा वादी क्र १ चा सख्खा भाउ असून

प्रतिवादी क्र २ ही प्रतिवादी क्र १ ची पत्नी आहे आणि प्रतिवादी क्र ३ हा या प्रतिवादींचा मुलगा आहे. वादी क्र १ प्रतिवादी क्र १ व त्यांचा भाउ तुकाराम आणि त्यांचे आई वडिल यांचे १९८६ पर्यंत हिंदू एकत्र कुटुंब होते आणि त्यांच्यामध्ये वडिलोपार्जित मिळकत दावा मिळकत १अ व १ब यांचे सरस निरस मानाने वाटप करण्यात आले. या मिळकती वादी क्र १ च्या हिस्स्यास आल्या. मात्र दावा मिळकत १ब ला कागदोपत्री त्यांच्या वडिलांचेच नाव राहिले. ही मिळकत त्यांनी वादी क्र १ ची पत्नी वादी क्र ३ हिच्या नावे १९९७ मध्ये केली.

३ वादी क्र १ हे मुंबई येथे नोकरीस होते आणि त्यांच्या हिस्स्यास आलेली वाद मिळकत अ ते ग या मिळकतींची देखभाल ते मुंबई येथून तारापूर येथे येउन जाउन करीत असत आणि त्यास प्रतिवादी क्र १ मदत करत असत. मार्च २०१२ अखेरपर्यंत तीच परिस्थिती होती. वर्ष १९८६ ते २०११ च्या दरम्यान १९९२ च्या सुमारास वादी क्र १ व प्रतिवादी क्र १ यांनी समाईकात भीमा नदीवरुन मौजे सुस्तें येथील गट क्र ४ मधून १३००० फुट पाईपलाईन करुन दोघांच्याही जमीनीस अर्ध्या हिस्स्याने पाणी मिळण्याची व्यवस्था केली. हीच परिस्थिती २०११ पर्यंत कायम राहिली. त्यानंतर वादी क्र १ व प्रतिवादी क्र १ यांनी पूर्वीच्या पाईपलाईन शेजारी दुसरी १३००० फूट पी व्ही सी पाईपलाईन मौजे सुस्ते येथील गट क्र ४ मधून केलेली आहे. त्यावर १५ एच पी ची इलेक्ट्रीक मोटार बसविली आहे. वर्ष १९८६ ते २०११ च्या दरम्यान वादी क्र १ यास माहिती होउ न देता प्रतिवादी क्र १ ने दावा मिळकतीमधील उस स्वत:च्या नावे साखर कारखान्यास देउन फार मोठी रक्कम उचलली. ही बाब माहित झाल्यानंतर २०११ च्या दरम्यान दावा मिळकतीची देखभाल सोडावी लागेल म्हणून प्रतिवादी क्र १ याने वादी क्र १

विरुध्द वर्तन करण्यास सुरुचात केली. त्यानंतर वर्ष २०११—१२,२०१२—१३ व २०१३—१४ या गळीत हंगामातील दावा मिळकतीमधील उस प्रतिवादीच्या नावे विठठल, भीमा, कुर्मदास, जकराया या सहकारी साखर कारखान्यांना पाठविला. व या तीन वर्षातील २००० टन उसाचे बील वादीस न देता त्याना जीवे मारण्याच्या व इतर धमक्या प्रतिवादी क्र १ ने दिल्या.

एप्रिल २०१४ च्या पहिल्या आठवडयात प्रतिवादी दावा मिळकतींवरील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु लागले. प्रतिवादी वादींना इलेक्ट्रीक मोटारीने व पाईपलाईनने पाणी घेउ देत नाहीत. त्यामुळे वादीचे अपरिमीत नुकसान होत आहे. त्यामुळेच वादींनी हा अर्ज दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील वादींच्या शांततामय ताब्यास हरकत करु नये आणि मौजे सुस्ते येथील गट क्र ४ मधील भीमा नदीवरील दोन इलेक्ट्रीक मोटार व पाईपलाईनने वादींना अर्ध्या हिस्स्याने दावा मिळकतीस पाणी घेण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात यावा यासाठी दाखल केला आहे.

४ <u>प्रतिवादी क्र १ ते ३ यांचे निशाणी १७ नुसार म्हणणे संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे</u>

मौजे सुस्ते ता. पंढरपूर येथील गट क्र ४ ही शेतजमीन बबन पवार यांच्या नावे असून या मिळकतीमध्ये इलेक्ट्रीक मोटार बसविण्यासाठी त्यानी वर्ष २००३ व वर्ष २०१२ मध्ये प्रतिवादी क्र १ च्या नावे लेखी संमतीपत्र लिहून दिले आहे. प्रतिवादी क्र १ च्या नावे असणा—या शेतजमीनीसाठी भीमा पाटबंधारे विभागाकडून रीतसर पाणी परवाना देखील

घेतलेला असून प्रतिवादी क्र १ ने त्याच्या खर्चाने १४० एम एम ची १३००० फुट व १६० एम एम ची १३००० फुट पाईपलाईन करुन त्यावर १५ एच पी ची इलेक्ट्रीक मोटार प्रतिवादी क्र १ च्या नावे बसवून प्रतिवादी त्याचा वापर करीत आहेत. यामध्ये वादींचा कसलाही हक्क हितसंबंध नाही. केवळ प्रतिवादीच्या आर्थिक प्रगतीमुळे वाईट हेतूने पाईपलाईनमध्ये हिस्सा दाखविण्यासाठी वादीने हा खोटया मजकूराचा अर्ज सादर केला आहे.

दावा मिळकत १ब मध्ये प्रतिवादी क्र १ व त्याचा भाउ तुकाराम यांचा हिस्सा आहे. त्यातील विहीर व इलेक्ट्रीक मोटार वादीचे नाही. दावा मिळकत १क मधील विहीर पाईपलाईन व इलेक्ट्रीक मोटार यांच्यामध्ये वादीचा काहीही संबंध नाही. उपरोक्त नमूद विहीर, इलेक्ट्रीक मोटार व पाईपलाईन प्रतिवादी क्र २ च्या मालकीची आहे. दावा मिळकत १ड मधील विहीर, इलेक्ट्रीक मोटार व १००० फुट पाईपलाईन ही प्रतिवादी क्र १ चा मुलगा सागर याच्या मालकीची आहे. याच्याशी देखील वादीचा कसलाही संबंध नाही. दावा मिळकत १इ मधील बांधकाम प्रतिवादी क्र ३ च्या नावे असलेल्या गट क्र ३५२/२ मध्ये आहे व ते प्रतिवादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीत आहे. केवळ ७/१२ पत्रकी असलेल्या पाण्याच्या साधनाची नोंद असल्याचा गैरफायदा घेउन वादी त्यावर स्वत:ची मालकी प्रस्थापित करीत आहेत.

५ प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील वर्ष २०११ ते २०१४ या तीन वर्षातील उसाचे पीक प्रतिवादीच्या नावे साखर कारखान्याला गाळपास घातले नव्हते आणि त्यामुळेच त्यांनी वादीला ४०,००,०००/— रुपये उसाचे बील देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. वादीने वैकल्पीकरित्या त्याचा कब्जा नाही असे नमूद केले आहे. त्यामुळेच दावा मिळकतीबाबत वादींनी त्यांचे

प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द केलेले नाही. वादींच्या हक्कात तूर्तातूर्त मनाई आदेश दिला गेल्यास वादी प्रतिवादींना दावा मिळकतीमधील मेहनत मशागतीस व नमूद पाईपलाईनच्या पाण्याच्या वापरास प्रतिबंध करुन प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान करणार आहेत. त्यामुळे अर्ज निशाणी ५ खर्चासह नामंजूर करण्यात यावा

६ प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. वादीचे विदवान वकील श्री.एम बी गाजरे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच त्यानी वादीतर्फे सादर केलेला लेखी युक्तिवाद निशाणी ४९ व प्रतिवादींतर्फे विदवान वकील श्री आर टी कोष्टी यांचा लेखी युक्तिवाद निशाणी ४८ अभ्यासला मी खालील मुददे निश्चित केले आणि त्यावर माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | मुददा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय ? | अंशत: होकारार्थी |
| २ | न्यायाचे संतूलन कोणाच्या बाजूने आहे ? | अंशत: वादींच्या हक्कात |
| ३ | तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर न केल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होईल ? | “अंशत: वादींचे” |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

मुददा क्र १ साठी

७ दावा मिळकती १अ,१ब आणि १ ग या वादी क्र १, प्रतिवादी क्र १ आणि त्यांचा भाउ तुकाराम मारुती नायगुडे यांच्या

वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटुंबाच्या मिळकतीचा भाग होत्या आणि वर्ष १९८३ मध्ये या भावांमध्ये मिळकतीचे वाटप होउन दावा मिळकती वादी क्र १च्या नावे करण्यात आल्या असे वादींचे कथन आहे. तेंव्हापासून या दावा मिळकतींवर वादींचीच कब्जेवहिवाट असल्याचे सिध्द करण्यासाठी वादीतर्फे निशाणी ४ सह या मिळकतींच्या ७/१२ उता—यांच्या प्रमाणित प्रती सादर करण्यात आलेल्या आहेत. दावा मिळकत १ अ गट क्र ३५४/२ च्या ७/१२ उता—याची प्रमाणित प्रत पाहिली असता त्याच्या मालकी व वहिती रकान्यात वादी क्र १ चे नाव असून ही मिळकत वर्ष १९८३ मध्ये त्यांच्या हिस्स्याला आलेली दिसते. दावा मिळकत १ब गट क्र २२४ ही मिळकत वादी क्र २ च्या नावे असून वादी क्र १ च्या वडिलांनी ही मिळकत फेरफार क्र २०६५ नुसार १९९७ मध्ये वादी क्र २ च्या नावे केलेली दिसते. तेंव्हापासून या मिळकतीच्या ७/१२ उता—याच्या मालकी व वहिती रकान्यात वादी क्र २ चेच नाव दिसून येते.

८ दावा मिळकत १क गट क्र २९३/२/२ या मिळकतीच्या ७/१२ उता—याला वादी क्र १ चे नाव मालकी व वहिती रकान्यात दिसून येते व त्याने ही मिळकत दिनांक २३.०७.२००३ रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतलेली आहे. दावा मिळकत १ ड गट क्र २९३/५/२ या मिळकती च्या ७/१२ उता—याच्या मालकी व वहिती रकान्यात वादी क्र ३ चे नाव दिसून येते. वादी क्र १ ने वादी क्र ३ अज्ञान असताना दिनांक २३.०७.२००३ रोजी ही मिळकत नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतलेली आहे असे फेरफार क्र १३६९ वरुन स्पष्ट होते. तसेच दावा मिळकत १ इ गट ३५२/३/खा ही मिळकत वादी क्र १ ने वादी क्र ३ अज्ञान असताना दिनांक ०७.०७.१९९९ रोजी ही मिळकत नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतलेली आहे असे फेरफार क्र ९८३ वरुन स्पष्ट होते. या मिळकतीच्या ७/१२

उता—याच्या मालकी व वहिती रकान्यात वादी क्र ३ चे नाव दिसून येते. दावा मिळकत १फ गट ३९/१/ब च्या ७/१२ उता—याची प्रमाणित प्रत पाहिली असता मालकी व वहिती रकान्यात वादी क्र १ चे नाव दिसून येते. ही मिळकत वादी क्र १ ने दिनांक २७.१२.२०१० रोजी नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतल्याचे फेरफार क्र २२५१ वरुन स्पष्ट होते.

९ उपरोक्त चर्चेवरुन ही बाब स्पष्ट होते की, दावा मिळकत १ अ , १ ब व १ ग बाबत प्रतिवादींचे कथन आहे की, उपरोक्त मिळकती वादींना सरस निरस मानाने वाटप होउन आलेल्या नाहीत. तर केवळ कब्जेवहिवाटीनुसार आणि अर्जावरुन याबाबत राजस्व अभिलेखात नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. याबाबत वादींनी प्रतिवादी क्र १ च्या नावावर असलेल्या वडिलोपार्जित मिळकती दर्शविण्यासाठी, मौजे मगरवाडी येथील गट क्र ३५४/१, गट क्र ३५३ पैकी, मौजे भोयरे येथील गट क्र ३९/१/अ या मिळकतींच्या ७/१२ उता—यांच्या प्रमाणित प्रती सादर केल्या. त्यानुसार प्रतिवादी क्र १ च्या नावावर वेगळे क्षेत्र असल्याचे दिसून येते व त्याचे नाव या मिळकतींच्या ७/१२ उता—यांच्या मालकी व वहिती रकान्यात दिसून येते.

तसेच दावा मिळकत १ ग याचे क्षेत्र देखील वादी क्र १, प्रतिवादी क्र १ व त्यांचा भाउ तुकाराम यांच्या समाईक कब्जेवहिवाटीत असल्याचे दिसते. याउलट दावा मिळकत १ अ व १ ब या वादी क्र १ व २ आणि मौजे मगरवाडी येथील गट क्र ३५४/१, गट क्र ३५३ पैकी, मौजे भोयरे येथील गट क्र ३९/१/अ या मिळकती प्रतिवादी क्र १ यांच्या नावावर करण्यात आलेल्या प्रथमदर्शनी दिसतात. त्यानुसार दावा मिळकत १ अ व १ ब केवळ कब्जेवहिवाटीनुसार वादी क्र १ व २ यांच्या नावावर आहेत असे जरी याक्षणी गृहीत धरले तरी या मिळकतींचा ताबा उपरोक्त नमूद वादींकडेच

असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. उपरोक्त मिळकती वादींना वाटपाव्दारे मिळालेल्या आहेत किंवा नाहीत ही बाब दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयाचा भाग आहे. मात्र या टप्प्यावर या दावा मिळकतींवरील वादींची कब्जेवहिवाट सिध्द करण्यासाठी दीर्घकाळापासूनच्या राजस्व अभिलेखातील नोंदीवर विसंबून राहणे आवश्यक ठरते. या नोंदीना गृहीतकाचे मुल्य आहे. त्याचे पुराव्यानिशी खंडन करता येते. मात्र प्रतिवादींतर्फे लगतचे शेतकरी किंवा इतर कोणत्याही साक्षीदाराचे शपथपत्र सादर करुन वादींच्या या मिळकतीवरील कब्जेवहिवाटीला आव्हानित करण्यात आलेले नाही. त्यामुळेच दावा मिळकत १ अ व १ ब वर वादींची कब्जेवहिवाट असल्याबाबतचा ठोस, सुसंगत व विश्वासार्ह पुरावा वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी दिसून येतो.

१० या आधीच नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकत १ क, १ड, १इ,१फ या वादींनी नोंदणीकृत खरेदीखताआधो विकत घेतलेल्या आहेत. या मिळकतींच्या राजस्व अभिलेखामधील मालकी व वहिती रकान्यात वादींचेच नाव दीर्घकाळापासून आहे. या नोंदींचे खंडन करणारा कसलाही पुरावा प्रतिवादींतर्फे सादर करण्यात आलेला नाही. त्यावरुन वादींचीच दावा मिळकत १क, १ड, १इ,१फ वर मालकी हक्काने कब्जेवहिवाट आहे ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते.

११ मात्र दावा मिळकत १ ग या मिळकतीच्या राजस्व अभिलेखातील मालकी व वहिती रकान्यात वादी क्र १, प्रतिवादी क्र १ व तुकाराम यांची नावे आहेत. वादींनी त्यांच्या ताब्यात असलेल्या हिस्स्याच्या चतु:सिमा सादर केलेल्या नाहीत. तसेच दावा मिळकत १ ग वर त्याचा ताबा असल्याबाबत कसलाही ठोस व विश्वासार्ह पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. त्यामुळेच या मिळकतीवरील निश्चित क्षेत्रावर वादींची कब्जेवहिवाट असल्याचे

प्रथमदर्शनी सिध्द होत नाही.

१२ प्रस्तुत प्रकरणी वादींचे असेही कथन आहे की,भीमा नदीवरील लिफटने पाणी आणण्यासाठी मौजे सुस्ते येथील जमीन गट क्र ४ मध्ये इलेक्ट्रीक मोटार बसविण्यात आलेली असून दावा मिळकतीपर्यत पाईपलाईन केलेली आहे आणि त्यामध्ये वादींचा १/२ हिस्सा आहे. प्रतिवादी उपरोक्त नमूद पाईपलाईनमधून पाणी घेण्यास वादींना हरकत अडथळा करीत आहेत आणि म्हणून याबाबत प्रतिवादींविरुध्द तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यात यावा. मात्र वादींच्याच लेखी युक्तिवाद निशाणी ४९ नुसार वादींनी उपरोक्त नमूद पाईपलाईनबाबतचा तूर्तातूर्त मनाई आदेश अंतिम न्याय निर्णयाच्या वेळी देण्यात यावा अशी निशाणी ४५ सादर केली आहे.

पुरसिस निशाणी ४५ पाहता पाईपलाईनच्या बाबत तुर्तातूर्त मनाई आदेश देण्याची गरज दिसत नाही. तसेच ही बाब सिध्द करणारा प्रथमदर्शनी पुरावा देखील वादींतर्फे या टप्प्यावर सादर करण्यात आलेला नाही. मौजे सुस्ते येथील गट क्र ४ च्या मालकाचे शपथपत्र वादींनी सादर केलेले नाही. याउलट प्रतिवादींतर्फे गट क्र ४ च्या मालकाचे प्रतिवादी क्र १ च्या हक्कात असलेले इलेक्ट्रीक मोटार बसविण्याबाबतच्या दोन संमतीपत्राच्या झेरॉक्स प्रती सादर करण्यात आलेलया आहेत. एकंदरीतच सर्व पुरावा पाहता निशाणी ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाईपलाईनबाबतचा तूर्तातूर्त मनाई आदेश देण्यासाठीचे कसलेही प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या हक्कात नाही.

१३ सबब वादींनी दावा मिळकत १ अ ते १ इ बाबत त्यांचे प्रथमदर्शनी प्रकरण सिध्द केले आहे. मात्र दावा मिळकत फ व ग या मोहोळ तालुक्यातील मिळकती असून त्या या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरील आहेत. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल करण्यात आला असता तर या सर्व

मिळकतींबाबत एकत्रितरित्या न्यायनिर्णय करता आला असता. मात्र प्रस्तुतचा दावा वाटपासासाठी नसून वादींना नुकसान भरपाई मिळावी आणि निरंतर मनाई आदेश मिळावा यासाठी दाखल केला आहे. त्यामुळेच या मिळकती या न्यायालयाच्या कार्यक्षेत्राबाहेरील असल्यामुळे याबाबत कसलाही मनाई आदेश देता येणार नाही. तसेच दावा मिळकत १ ग ही आजही समाईक असल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होत असल्यामुळे देखील या बाबत तूर्तातूर्त मनाई आदेश देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच या आधीच नमूद केल्याप्रमाणे मौजे सुस्ते येथील गट क्र ४ येथून करण्यात आलेल्या पाईपलाईनमधून येणा—या पाण्याच्या वादींच्या कथीत अर्ध्या हिस्स्याबाबत कसलाही तूर्तातूर्त मनाई आदेश देता येणार नाही असे याआधीच नमूद करण्यात आलेले आहे. सबब वादीच्या हक्कात केवळ दावा मिळकत १ अ ते १इ बाबत प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुददा क्र १ चे उत्तर अंशत: होकारार्थी देतो.

मुददा क्र २ साठी

१५ या आधीच नमूद केल्याप्रमाणे वादींच्या हक्कात केवळ दावा मिळकत १ अ ते १इ बाबत प्रथमदर्शनी प्रकरण आहे. त्यामुळेच याच हददीपूरते न्यायाचे संतूलन वादींच्या हक्कात आहे. त्यामुळे मी मुददा क्र २ चे उत्तर अंशत: वादीच्या हक्कात असे देतो.

मुददा क्र ३ साठी

१६ मुददा क्र १ व २ चे निष्कर्ष पाहता वादींची दावा मिळकत १ अ ते १इ या मिळकतीवर अनेकवर्षापासून मालकी हक्काने शांततामय कब्जेवहिवाट असल्याचे अभिलेखावर उपलब्ध ठोस, सुसंगत व विश्वासार्ह पुराव्यानिशी सिध्द झाले आहे. यापैकी दावा मिळकत १ इ मध्ये गट क्र

३५२/३ क्षेत्रात घराचे बांधकाम असल्याचे व ते वादी क्र १ च्या मालकीचे असल्याचे वादींचे कथन आहे. याउलट उपरोक्त घर हे गट क्र ३५२/२ मध्ये असून त्याच्या मालकी हक्कात प्रतिवादी नं २ चे नाव आहे आणि प्रतिवादीच त्या मिळकतीत राहतात असे प्रतिवादींचे कथन आहे. ही बाब सिध्द करण्यासाठी प्रतिवादींतर्फे कर भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. त्यानुसार दावा मिळकत १ इ मध्ये नमूद बांधकाम गट क्र ३५२/२ मध्ये असेल तर वादीच्या हक्कात दावा मिळकत १ इ बाबत देण्यात येणा—या तुर्तातूर्त मनाई आदेशाचा परिणाम प्रतिवादीवर होणार नाही.

त्यामुळेच मुददा क्र १ व २ चे निष्कर्ष पाहता दावा मिळकत फ व ग आणि मौजे सुस्ते येथील गट क्र ४ येथून करण्यात आलेल्या पाईपलाईनमधून येणा—या पाण्याच्या वादीच्या कथित अर्ध्या हिस्स्याबाबत कसलाही तूर्तातूर्त मनाई आदेश देता येणार नाही. मात्र उपरोक्त निष्कर्ष पाहता दावा मिळकत १ अ ते १ इ वरील वादींच्या शांततामय कब्जे वहिवाटीस या दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयापर्यंत प्रतिवादींनी हरकत करु नये असा मनाई आदेश न दिल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल. त्यामुळेच याबाबत तुर्तातूर्त मनाई आदेश देणे न्याय संगत राहील. त्यामुळे मी मुददा क्र ३ चे उत्तर “अंशत: वादींचे” असे देतो.

<u>मुददा क्र ४ साठी</u>

१७ मुददा क्र १ ते ३ चे निष्कर्ष पाहता अर्ज निशाणी ५ खर्चासह अंशत: मंजूर करणे न्यायसंगत राहील. त्यामुळे मी मुददा क्र ४ चे उत्तर खालीलप्रमाणे देतो.

## आदेश

१ अर्ज निशाणी ५ खर्चासह अंशत: मंजूर करण्यात आला आहे.

२ प्रतिवादी किंवा त्यांच्यातर्फे इतर कोणीही वादींच्या दावा मिळकत १ अ ते १इ वरील शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयापर्यत कसलाही हरकत अडथळा करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश देण्यात येतो

दिनांक २१.०३.२०१६ (हे. भा. सिरसाळकर)

**दिवाणी न्यायाधिश व स्तर,पंढरपूर**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order

a) Name of the Stenographer : A. J. Sure

b) Court : C.J.S.D. Court Pandharpur

c) Order signed by P. O. : 21/03/2016

d) Order uploaded on : 21 /03/2016